प्रिया प्रमोद दिवेकर
वि.
प्रमोद प्रकाश दिवेकर

## फौजदारी चौकशी अर्ज क्र.३५२/२०२१ मधील निशाणी क्र.६७ खालील आदेश

प्रस्तुतच्या अर्जाद्वारे सामनेवाला क्र.१ याने नि.क्र.६३ वरील दि.२५/०१/२०२४ रोजी झालेला आदेश प्रलंबित ठेवून सुनावणी पुढे चालवण्याची विनंती करण्यात आलेली आहे. त्याला अर्जदारतर्फे हरकत नोंदवण्यात आलेली आहे.

०२. उभयपक्षकारांतर्फे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला, अर्जाचे व प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा मुळ अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ प्रमाणे दाखल केलेला आहे. अर्जदारने निशाणी क्र.५ अन्वये सदर कायद्याचे कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यासाठी अर्ज दिलेला होता. त्या अर्जावर दि.३१/०१/२०२३ रोजी अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रुपये चार हजार पोटगी अर्जदारला द्यावी असा आदेश या न्यायालयाने पारीत केलेला आहे. तो आदेश सामनेवाला क्र.१ याने मा.जिल्हा न्यायालय, पनवेल येथे फौजदारी अपिल क्र.१४/२०२३ दाखल करुन आव्हानित केलेला होता. मा.जिल्हा न्यायालय, पनवेल यांनी ते अपिल फेटाळून या न्यायालयाने केलेला अंतरिम पोटगीचा आदेश कायम केलेला आहे.

०३. त्या दोन्हीही आदेशांचे पालन सामनेवाला क्र.१ याने केलेले नाही व आजतागायतपर्यंत पोटगीची नियमित अथवा थकीत रक्कम देखील भरलेली नाही असे अभिलेखावरुन दिसते. अर्जदारने निशाणी क्र.४१ अन्वये पोटगीची थकीत रक्कम वसुल करण्यासाठी जप्ती वॉरंट काढण्याबाबत अर्ज दिलेला होता. तो अर्ज मंजुर होवून सामनेवाला क्र.१ विरुद्ध जंगम मालमत्ता जप्तीचे वॉरंट काढण्यात आले होते. परंतु ते

वॉरंट न बजावता परत आलेले आहे. तसा अहवाल निशाणी क्र.५७ वर दाखल करण्यात आलेला आहे. त्यामध्ये असे स्पष्ट नमुद करण्यात आले आहे की, सामनेवाला क्र.१ हा दिलेल्या पत्त्यावर मिळून आलेला नाही व तेथे त्याची कोणतीही जंगम मालमत्ता देखील मिळून आलेली नाही. यावरुन ही बाब स्पष्ट होते की, सामनेवाला क्र.१ याने जंगम मालमत्ता जप्ती वॉरंटची बजावणी होवू नये म्हणून स्वतःचे अस्तित्व लपवलेले आहे.

०४. एकंदरीत सर्व अभिलेख पाहता सामनेवाला क्र.१ हा पोटगीची थकीत अथवा नियमित रक्कम देखील भरण्यास तयार नाही. तो स्वतः बेरोजगार असल्याचे कारण पुढे करत आहे. परंतु ती त्याची हरकत विचारात घेता येणार नाही, कारण त्या सर्व बाबींचा विचार करुनच अंतरिम पोटगी मंजुर करण्यात आलेली आहे. सामनेवाला क्र.१ न्यायालयाच्या आदेशाचा जाणीवपुर्वक अवमान करत आहे व पोटगीची रक्कम भरण्यास टाळाटाळ करत आहे असे निष्कर्ष निशाणी क्र.६३ च्या आदेशामध्ये नोंदवलेले आहेत. त्याचप्रमाणे मा.ना.सर्वोच्च न्यायालयाने ***राजनेश वि. नेहा 2021 ALL MR (Cri) 1172 (S.C.)*** या न्यायनिर्णयामध्ये पोटगी वसुली संदर्भात दिलेल्या महत्वाच्या निर्देषांचा उल्लेख त्या आदेशामध्ये करुन न्यायालयाला थकीत पोटगीची रक्कम वसुल करुन देण्यासाठी सामनेवाला क्र.१ याच्याविरुद्ध फौ.प्र.सं.कलम १२५(३) प्रमाणे कारावासाची शिक्षा देणे आणि त्याचा बचाव नष्ट करणे याच्याव्यतिरीक्त कोणताही पर्याय उरत नाही असे देखील निष्कर्ष नोंदवले होते. परंतु त्या तरतुदींचा अवलंब करण्यापुर्वी सामनेवाला क्र.१ याला थकीत पोटगीची रक्कम भरण्यासाठी आणखी एक संधी देणे गरजेचे वाटल्यामुळे, सामनेवाला क्र.१ याला दि.०५/०२/२०२४ पर्यंत थकीत पोटगीची कमीत कमी ५०% रक्कम अर्जदारला द्यावी असे निर्देश देवून अर्ज प्रलंबित ठेवण्यात आला होता.

०५. परंतु त्याही आदेशाचे पालन सामनेवाला क्र.१ तर्फे करण्यात आले नाही व पोटगीची थकीत अथवा नियमित रक्कम देखील अर्जदारला देण्यात आलेली नाही. त्याउलट सामनेवाला क्र.१ याने प्रस्तुतचा अर्ज देवून तो आदेश प्रलंबित ठेवण्याची विनंती केलेली आहे. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ मधील तरतुदी व विशेष करुन कलम २३ ची तरतुदी यांचा विचार केला असता, सदरचा अर्ज मंजुर केल्यास त्या तरतुदींना कोणताही अर्थ उरणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज

मंजुर करणे उचित होणार नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## आदेश

अर्ज (निशाणी क्र.६७) नामंजुर करण्यात येत आहे.

**(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

सही

दिनांकः २१/०२/२०२४.
खालापुर

**(पी.एम.माने)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, खालापुर.